प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश यांचे कार्यालय, बुलडाणा.
आदेश क्रमांक: १९९ सन २०२६, दिनांक : १८/०८/२०२६.

पहा:- ०१) मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे गोपनिय पत्र बी (जन) ५६०१/५७/२०२४/ २१९०, दिनांक ०५/१२/२०२४.
०२) जिल्हा न्यायालय, बुलडाणा आदेश क्रमांक १५२/२०२६, दिनांक ०३.०७.२०२६.
०३) दिनांक २८/०७/२०२६ रोजीची कार्यालयीन टिपणी व त्यावरील पारीत आदेश.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचे संदर्भ क्रमांक ०१ मध्ये निर्देशित करण्यात आलेल्या अटी व शर्ती अन्वये या जिल्हयाचे न्यायीक आस्थापनेवर कनिष्ठ लिपीक पदाची प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. संदर्भ क्रमांक ०२ अन्वये या न्यायिक जिल्हयाच्या आस्थापनेवर रिक्त असलेल्या कनिष्ठ लिपीक या पदाच्या अनुषंगाने तसेच, संदर्भ क्रमांक ०३ वरील पारीत आदेशान्वये खालील प्रमाणे स्थलांतर व नियुक्तीबाबतचा आदेश पारीत करण्यात येत आहे.

अ.क्र.	कर्मचा-याचे नाव व पदनाम	नवीन नियुक्ती व स्थळ
०१	श्री. पुरुषोत्तम विलासराव दोनाडकर, कनिष्ठ लिपीक पदाची प्रतिक्षा यादी (सन २०२३) मधील अनुक्रमांक १० वरील उमदेवार.	जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांचे आस्थापनेवर श्री. यु.ए.अहेर यांचे रिक्त असलेल्या पदी कनिष्ठ लिपीक म्हणुन नविन नियुक्ती.

सदर्हु आदेश हा दिनांक २१/०८/२०२६ रोजीचे मध्यान्हापुर्वपासुन अंमलात येईल.

नवनियुक्त उमेदवार यांना सुचित करण्यात येते की, त्यांची या आदेशाद्वारे करण्यात आलेली नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असून त्यांना कोणत्याही प्रकारची नोटीस न देता शासनाचे सेवेतून कमी करण्यात येईल. तसेच त्यांची नियुक्ती मा. उच्च न्यायालय, मुंबई व जिल्हा न्यायालयाच्या भविष्यात होणाऱ्या आदेशाला अधिन राहुन करण्यात आलेली आहे याची त्यांनी नोंद घ्यावी.

त्यांना पुढे असेही सुचित करण्यात येते की, त्यांनी दिनांक २१.०८.२०२६ रोजीचे मध्यान्हापुर्वला किंवा त्यांना हा नियुक्तीचा आदेश मिळाल्यापासुन ०७ दिवसाचे आंत त्यांनी त्यांचे पदी रुजु व्हावे. तसे करण्यास चुकल्यास त्यांचे नाव प्रतिक्षा यादीवरुन काढून टाकण्यात येईल व त्यांचा नियुक्तीचा आदेश हा रद्द करण्यात येईल.

उपरोक्त सन २०२३ चे कनिष्ठ लिपीक पदाची प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची वेतननिश्चिती एस-६, वेतन बॅण्ड १९९००-६३२००/- या सुधारीत संरचनेत रुपये १९९००/- या मुळ वेतनावर निश्चित करण्यात येत आहे.

उपरोक्त उमेदवाराने कामावर रुजु झाल्यानंतर त्यांचे तात्पुरत्या स्वरुपाचे नेमणुकीचे बंधपत्र, एकनिष्ठतेचे शपथपत्र, वैद्यकीयदृष्टया पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र आणि नियमानुसार आवश्यक ती सर्व कागदपत्रे त्वरीत नेमणुकीच्या ठिकाणी सादर करावी. तसेच त्यांना त्यांचे पदाचा राजीनामा स्वत:हून दयावयाचा झाल्यास ०१ महिना अगोदर तशी नोटीस अथवा त्या ऐवजी ०१ महिन्याचे वेतन त्यांना भरुन दयावे लागेल.

आस्थापना विभाग, जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांना असेही सुचित करण्यात येते की, नवनियुक्त उमेदवार हे आस्थापनेवर रुजू होताक्षणीच त्यांचे कडून आवश्यक ते प्रतिज्ञापन घेवून व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक: चारित्र्य-२११७/प्र.क्र.४८३ /२०१७/१६-अ, दिनांक २८.०८.२०१७ मध्ये नमुद केल्याप्रमाणे उमेदवाराचे चारित्र्य व पुर्व चारित्र्य याची पडताळणी करण्याबाबत साक्षांकनाचा सुधारीत नमुना दोन प्रतीत घेण्यात येवून पुढील कार्यवाही करण्यात यावी.

उमेदवारांनी चारित्र्य व पुर्वचारित्र्य याची पडताळणी करण्याबाबतचे साक्षांकन नमुन्यामध्ये सादर केलेली माहिती असत्य असल्याचे आढळुन आल्यास निर्गमित करण्यात आलेले तात्पुरते नियुक्तीपत्र हे रद्दबातल करुन भारतीय न्याय संहितेनुसार फौजदारी कारवाई तसेच शासन सेवेत कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल व प्रतिक्षा यादीवरुन नाव कमी करण्यात येईल.

(श्रीचंद दौ. जगमलानी)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
बुलडाणा.

पृष्ठांकन क्रमांक /आस्था/ ४६६६ /२०२६, दिनांक :१८/०८/२०२६.
प्रतिलिपी माहिती आणि आवश्यक त्या कार्यवाही करीता रवाना.

१) अधिक्षक (कार्यव्यवस्थापन / तांत्रिक विभाग), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.
२) श्री. पुरुषोत्तम विलासराव दोनाडकर, राहणार- मु, नखेगांव, पो. तरनोळी, ता. दारव्हा, जिल्हा यवतमाळ ४४५ २१० (नोंदणीकृत डाकेने पोच पावतीसह)
३) सहायक अधिक्षक (वित्त व लेखा / आस्थापना विभाग), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

४) वरिष्ठ लिपीक (वेतन देयक / सेवानिवृत्ती प्रकरणे / प्रवास भत्ता/ कार्यव्यवस्थापन विभाग), जिल्हा न्यायालय, बुलडाणा.

५) अध्यक्ष / सचिव, जिल्हा न्यायालयीन कर्मचारी पत संस्था, खामगांव.

६) सहायक, संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, बुलडाणा यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी सदरचा आदेश वेबसाईट / ई-मेल वर टाकावा.

७) कार्यालय प्रत.